# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ८ वे** | **जुलै, २०१२** | **अंक २ रा**



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ९६५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
९९७०१७४८१८

**कार्यवाह :**
**श्री. गोपाळ भाटवडेकर**
पुणे. ९८५०९७९७०६

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२-२५२४२७०६
श्री. प्रदीप पुराणिक, बेळगाव
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई : ९७६९३२९९९३
सौ. सुषमा करकरे, ठाणे : ०२२-२५३६८७२४
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७-२६०१४५७
प्रा. शिरीष दिलीप फडणीस, सातारा : ९८९००४००२६
श्री. मधुसूदन वा. देसाई, रत्नागिरी : ०२३५२-२२३४४१
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ९२२७१३५७९४

**इतर संस्थांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) (२०१२-१३ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, मनिऑर्डर, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५११०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे - ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी सौ. सुषमा करकरे, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**- श्री. हेमकिरण बाक्रे**


**नियतकालिकाचे नाव** : 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे - ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


५ कन्या पतीची बारा संसार चित्रे

७ करमणूक की कलह

७ कऱ्हाडे (कविता)

९ यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा?

१३ पसायदानाचा सामाजिक आशय

१५ श्रावणी

१६ 'शब्द'

१९ नातीगोती

२१ संस्थावृत्त

२२ श्रद्धांजली

२३ आद्य मराठी पत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर

२४ सुभाषित



'संपर्क' हे नियतकालिक भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने ज्ञाती बांधवांसाठी एकवीरा प्रकाशन व प्रसिद्धीसेवा, कर्वेनगर येथे छापून, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, 'अनिश प्रासाद', ४३७, नारायण पेठ येथे प्रसिद्ध केले.



सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

– संपादक



# संपादकीय

श्री. जयवंत भोपटकरांच्या व्यवसाय व्यग्रतेमुळे 'संपर्क' साठी ते पुरेसा वेळ देऊ शकणार नाहीत असे त्यांनी कळविल्यानंतर पर्याय निवडण्याची वेळ आली व या नियतकालकाचा संपादक म्हणून माझी नियुक्ती झाली.

वास्तविक पाहता मला यापुर्वीचा अशा प्रकारचा काहीही अनुभव माझ्या गाठीशी नाही आहे म्हणून ही जबाबदारी स्वीकारण्यांस मन कचरत होते. पण मग आठवले की माणूस हा सदैव विद्यार्थी असतो व आयुष्यांत काहीना काही तो शिकतच असतो. काही कामांची वेळ लौकर तर काहींची उशिरा, पण शिकणे चालूच राहते. नाही का?

या नियतकालीकाच्या संपादकत्वाची जबाबदारी स्वीकारताना एक गोष्ट लक्षांत आली ती म्हणजे याचा सध्याचा व्याप आपल्या सर्व संघाची एकत्रित सभासद संख्या बघता फारच लहान आहे व तो व्याप वाढविणे हिच एक मोठी जबाबदारी आहे.

या जबाबदारीचा जेंव्हा मी आणखी विचार करु लागलो तेंव्हा हेही लक्षांत आले की या नियतकालीकात सुधारणा करण्यांत भरपूर वाव आहे. अर्थात हे जरी खरे असले तरी त्याचबरोबर काम सोपे नाही हेही जाणवले. तसे पहायला गेले तर अवघड काम करुन दाखविणे ही एक संधीच असते व ती सर्वांना मिळत नाही. जर आपल्याला मिळालीच आहे तर, प्रयत्न करुन बघायला काहीच हरकत नाही असा विचार केला. संपादक मंडळातील व्यक्ती, संघाच्या पुणे शाखेचे विश्वस्त मंडळ आणि हो आपल्यासारखे सुजाण वाचक, लेखक, जाहिरातदार इत्यादी सर्व लोक हे अवघड काम अशक्य नाही याची जाणीव स्वतःहून मदत करुन देतील असा विश्वास मला वाटला व मनावरचे ओझे हलके झाले.

कुठलेही नियतकालीक चालवायचे असेल व तेही नियमितपणे, तर आर्थिक पाठबळाची आवश्यकता असते हे वेगळे सांगायची गरज नाही. आपल्यापैकी अनेकजण आज व्यवसाय करतात तर काहीजण उच्च व अती उच्च पदावर कार्यरत आहात याचाच अर्थ अत्यंत आवश्यक असे आर्थिक पाठबळ आपल्याकडे निश्चितच आहे, पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो व कदाचित म्हणूनच नियतकालीक चालविणे हे आपल्याला अवघड वाटावयास लागते. परंतु मला खात्री आहे की आर्थिकदृष्ट्या जे समर्थ आहेत ते याची नोंद घेतील व आपल्या इवल्याशा समाजाची भरभराट करण्यात मला मोलाची मदत करतील.

मला कल्पना आहे की, नियतकालीक एक ठराविक साच्यात चालविता येत नाही. त्यासाठी विविधांगी लेखन लागते. थोडे मनोरंजन, थोडी करमणूकही लागते. त्याकरता मला आपल्यापैकी प्रत्येकाची मदत निदान खारीच्या वाट्याऐवढी तरी लागेल. आपण माहितीपर लेख, कविता, कथा, विनोद, वात्रटिका लिहून पाठवल्यास आपले नियतकालीक एकसुरी रहाणार नाही.

मला आठवते १९८०-८१ चा सुमार असावा डॉ. श्रीकांत मुंदरगी, कोल्हापूर यांचे बेळगांवच्या बॅ. नाथ पै व्याख्यानमालेत व्याख्यान होते. त्यांनी त्यावेळेस क्लोनिंगची माहिती देताना सांगितले की, सध्या असे संशोधन चालू आहे की, ज्यायोगे आपल्याला हेमा मालीनीसारखी रुपसुंदरी आपल्या घरांत जन्मावी असे वाटले तर तेही शक्य होईल पण त्याचवेळी हेही लक्षांत घेतले पाहिजे की अशा परिस्थितीत हेमा मालीनीचे सौंदर्याचे हे वेगळेपण राहणार नाही व आपले जीवन कदाचित निरस होईल.

विविधता हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे व म्हणूनच आपल्या नियतकालीकांत विविधतेचा समावेश करणे मला आवश्यक वाटते.

तर वाचकहो ही आपल्या मैत्रीची सुरुवात आहे व तुम्हा सर्वांच्या एकत्रित पुढाकारानेच आपण आपली उद्दीष्टे पुर्ण करणार आहोत.

मूलतः हे नियतकालीक आपले आहे. आपल्या छोट्याशा समाजाचे आहे हे आपल्या मनांत रुजले की आपण काहीही करु शकतो हे आपल्याला जाणवेल.

मग देणार ना साथ या महाकार्याला? आता आपली ओळख होत आहे.

आपल्या मैत्रीची ही सुरवात मानु या कां आपण?

An Aesthetic Essence To Advertising

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

Domination in

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता
हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम.
आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# कन्या पतीची बारा संसार चित्रे

**विलास गोपाळ देव**


**पती–पत्नी दोघेही कन्या राशीचे असे म्हटल्यावर आठवते ते देवलांच्या संशयकल्लोळमधील फाल्गुनराव–कृत्तिकेचे जोडपे. संपूर्ण नाटकच मुळी खोट्या संशयावर आधारित. तसे फाल्गुनराव–कृत्तिकेचे संवाद, बोलणे खटकेबाज, म्हणींनी सजविलेले अगदी तुम्हा कन्या मंडळींना शोभेसे. तसे नवराबायको दोघेही एकाच राशीचे म्हणजे ३६ गुण जमलेले जोडपे. तुम्हा दोघांनाही वाचनाची आवड, दोघांचेही वाचन चतुरस्त्र, दोघांच्याही जीभेवर सरस्वती, दोघांचीही स्मरणशक्ती उत्तम, दोघेही तुंदिलतनु लंबोदर, आणि सतत ''इधर जाऊँ या उधर जाऊँ'' अशा संभ्रमात दोघेही,**

तुमची आणि कर्क स्त्रीची पती–पत्नीची जोडी म्हणजे खूप जुळणारी नसली तरी अगदीच न जुळणारी अशीही नाही. कर्क रास ही तुमच्यासारखीच स्त्री रास, कर्केचा स्वामी चंद्रही तुमच्या राशीस्वामी बुधासारखाच सौम्य ग्रह. फक्त कर्क ही चर रास अर्थात निर्णयक्षमता व क्रियाप्रतिक्रिया जलद, तीव्र असतात. तशी कर्क स्त्री भावनाप्रधान, हळवी पण स्वभावाने खूप चंचल असते. प्रेमळ मातेसारखी ही कर्क स्त्री पत्नी म्हणून 'भोज्येषु माता' हे लक्षण नक्कीच पूर्ण करते. घरकाम, बालसंगोपन, शेजार–पाजार नातेवाईक यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध या बाबतीत बारा राशीच्या स्त्रियांत अग्रक्रमाने कर्क पत्नीचे नाव घ्यावे लागेल. फक्त तुमच्या संशयी, शंकेखोर स्वभावामुळे तुमचे तिचे कसे जुळणार? त्यात तिच्या निर्णयक्षमतेपुढे तुम्ही फिके पडता. घरामध्येही सर्व क्षेत्रात तिचाच वरचष्मा आणि बोलबाला. तुमच्या तिरकस बोलण्याचा, टीकाखोर वृत्तीचा, आडून बोलण्याचा तिला तिटकारा. तसे पाहता तुमचा राशीस्वामी असणाऱ्या बुधाला इंदुपुत्र म्हणतात आणि इंदु म्हणजे चंद्र. त्यामुळे अर्थातच चंद्राची कर्क आणि बुधाची कन्या या राशींचे बऱ्यापैकी जमावयाला हवे. पण कर्क ही जलतत्त्वाची रास तर कन्या ही पृथ्वीतत्त्वाची रास. वाहत्या पाण्याला अडविण्यासाठी मातीचा बांध घालतात आणि माती पाण्याच्या प्रवाहात वाहून जाते. थोडक्यात हे जल–पृथ्वीचे नाते थोडसे न पटणारेच, पण त्याचवेळी पाणी साठविण्यासाठी मातीचे भांडे लागते आणि मातीच्या कणांना एकत्र ठेवण्यासाठी थोडे पाणी लागतेच. तेव्हा कर्क – कन्या जोडपे एकमेकांशी सहकार्य करीत आनंदात राहू शकते. कर्क पत्नीला मनाचे महत्त्व तर कन्या पतीला बुध्दीचे आकर्षण पण मन आणि बुध्दी एकत्र आले तर जीवनाचा स्तर उंचावणारच नाही का? तुमच्या चतुरस्त्र भावनाप्रधान स्वभावाचा गोडवा गा, तुमची पत्नी नक्कीच म्हणेल, ''ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे''.

कन्या राशीच्या पुरूषाचे सिंह स्त्रीशी जमणे तसे कठीणच. अर्थात कन्या–मेष जसे षडाष्टक तसे तुमचे जोडपे निश्चितच नाही. पण कितीही म्हटल तरी आपल्या पुरूषप्रधान संस्कृतीत साहसी, आक्रमक पत्नी आणि सतत दुविधेत असणारा, संशयी पुरूष हे जोडपे नांदणे कठीणच. मेष पती, कन्या पत्नी किंवा मेष पत्नी–कन्या पती ही दोन्ही जोडपी षडाष्टकातील. पण त्यातील पहिले नांदण्याची शक्यता थोडी जास्त कारण नैसर्गिकदृष्टीने आक्रमक असणारा पुरुषच साहसी राशीचा होतो. तसेच सिंह पती–कन्या पत्नी हे जोडपे अधिक चांगले नांदू शकते, कारण पतीराज वनराज असतात. तुमच्या सिंह पत्नी–कन्या पती जोडप्यात पत्नी राणी, पण तुम्ही राजा नसता. इथेच तुमच्या पुरुषी अहंकाराला ठेच पोचते. पण स्त्री पुरूष समानतेच्या जगात तुमच्या पत्नीच्या सात्विक वृत्तीचा, स्थिर बुध्दीचा, कठोर निर्णयक्षमतेचा, धीरोदात्त स्वभावाचा तुम्हाला अभिमान वाटला पाहिजे. सिंह ही रविची रास तर कन्या बुधाच्या स्वामीत्वाखालील रास. राजा निर्णय जरूर घेतो पण त्याचे निर्णय कार्यान्वित करण्यासाठी सचिव लागतोच. इतकेच नव्हे तर राजाला निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी लागणारी माहिती सचिवच देतो हे ध्यानात घ्या आणि गृहिणी सचिव, ऐवजी तुम्हीच तुमच्या पत्नीचे सचिव बना. पत्नीचा स्पष्टवक्तेपणा, सडेतोड स्वभाव, अन्याय सहन न करण्याची वृत्ती सर्व योग्यच असते. रविप्रधान अशा या स्त्रीला तुमच्या बुधप्रधान व्यवहार चातुर्याची जोड मिळाली तर संसाराचे चित्र नक्कीच उत्तम होईल. सचिव बनण्यात कमीपणा कसला, आठवा दूरदर्शनवरील जुनी इंग्रजी मालिका, ''येस मिनिस्टर'' किंवा ''येस प्राईम मिनिस्टर''. सिंहाला जर थोडा मान दिला की कन्येची मान शाबूत राहणारच. तसा बुध नेहमी रविचे बोट धरून मागेपुढे राहात असतोच आणि ज्योतिषात फक्त बुधाला अस्तंगत्वाचा दोष कमी आणि बुधादित्य योगाला (रवि–बुध युती) विद्वत्तेचे प्रतिक समजतात. मग तुमच्या विनोदी, हजरजबाबी बोलण्याने पत्नीच्या तापट स्वभावाला आवर घाला, तिच्या स्थिर बुध्दीला तुमच्या चतुरस्त्र बुध्दीची जोड द्या, संततीला तुम्ही आईच्या चढत्या पाऱ्यापासून दूर ठेवा, आपोआपच 'एक मंजिल राही दो फिर प्यार न कैसे हो' अशी परिस्थिती घरात राहील.

पती–पत्नी दोघेही कन्या राशीचे असे म्हटल्यावर आठवते ते देवलांच्या

**(पुढील मजकुर पान नं.१७ वर पहा)**


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९११००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८१७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# करमणूक की कलह

**सौ. ज्योत्स्ना पंडित**

आपल्या 'इडियट बॉक्स'ने त्याचे नाव कधीचेच सार्थक केले आहे. पण 'फॅमिली ड्रामा' दाखविण्याची सवय झालेल्या या संचाला आता करमणूक देण्यापेक्षा धक्का, कलह द्यायची सवय जडली. 'सा रे ग म प' चॅलेंजची जाहिरात हे सांगून गेली की करमणूक करता करता, गुणांची पारख करता करता शेवटी गुणदोषांचे विवेचन सुरू झाले आहे. आता विवेचनानंतर रागलोभ आणि शीतयुद्ध.

संगीताला सीमारेषा नसतात असा दाखला देऊन यु. पी. बिहार विरुद्ध महाराष्ट्र अशा युद्धाची घोषणा झाली. व्यक्तींमध्ये लपलेला कलाकार शोधण्याचे कार्य करणाऱ्या वाहिन्या जाब विचारायला लागल्या की उत्तर प्रदेशींबरोबर महाराष्ट्राने काय केले? कशासाठी विचाराया हा प्रश्न? कुठे विचारायचा? आणि मुख्य म्हणजे कोणी विचारायचा? ही कल्पना ज्या कोणाला आली असेल त्याला सरकारने महाराष्ट्रातून तडीपार करावे. ज्या प्रांताचा हा प्रश्न नाही त्यांनी यात नाक खुपसून फक्त टी. आर. पी. वाढवून घेतले. त्यांना त्यांचे उद्योग उरलेले नसतील तर भारत-चीन, भारत-पाकिस्तान सीमेवर जावे व तिथे असले प्रश्न विचारावे.

पाकिस्तानाकडून भारतावर जो हल्ला झाला (२६/११) तेव्हा पाकिस्तानी गायक 'सा रे ग म प' मध्ये सहभागी प्रतिस्पर्धी होते. जाब विचारायची आयती संधी समोर उभी होती, तेव्हा का नाही विचारले? तेव्हाच कशाला, पाकिस्तानने भारतावर नेहमीच हल्ले केले तरीही 'सा रे ग म प' वाल्यांनी त्यांना घेतलेच. ज्यांना येवढी तळमळ आहेच बऱ्या वाईटाशी, त्यांनी असे कसे केले? संगीत शिक्षण येवढं अफाट आहे की, ज्या वयात सूत्रधारांनी हे प्रश्न केले, त्यांच्याविषयी प्रश्न पडला की ह्या वयात ह्यांच संगीत शिक्षण होऊन मग हे इतर विषय घेऊ लागलेत की काय? संगीताला सीमा नसतात म्हणायचं, संगीताला भाषा नाही म्हणायचं आणि आपणच हे वाद काढायचे. इतका मार्मिक विषय बोलणारे मुलं मुली आता कुठे जग पहायला लागले. त्यांना राज्य, देश, घटना, लोकसंख्या ह्या सगळ्या बाबी पानसुपारी सारख्या तोंडी दिल्या. त्या त्यांनी चघळायच्या आणि गिळायच्या येवढ्याच साठी. ज्यांनी हा मुद्दा 'सा रे ग म प' मध्ये मांडला ते मराठी मातीत स्थिरावल्यावर असं का बोलतात? तिथे येऊन ते देश-विदेशात लोकप्रिय होतात तिथल्या लोकांसाठी हे मुलं-मुली काय करतात? ह्यांनी पाकिस्तानी स्पर्धकांना जम्मु-काश्मिरबद्दल प्रश्न का नाही विचारले? तालिबानींबद्दल का नाही सल्ले दिले?

इथे राहून मोठं व्हायचं, उद्योग, जमिनी काबीज करायच्या पण उद्योगांमध्ये भरती तिकडून आणायची. उपजिविका ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे. त्याच्याशिवाय जगता येत नाही. पण उपजिविकेची गरज फक्त यु.पी, बिहारच्या लोकांनाच आहे? घटनेचा हवाला देत, भाषेचं महत्व सांगत, मुंबईच काय अख्खा महाराष्ट्र हक्काचा सांगतात, मग भाषावार, प्रांतवार रचना घटनेनी केली ती चूक आहे? ज्या भाषांनी राज्यबांधणी झाली ती चूक आहे? ती कशासाठी केली गेली? भारत अखंड म्हटला तरी राज्याचे खंड का पाडले गेले? तिथे राज्य-सरकार ही आमदारांची यंत्रणा का चालविली जाते?

घटनेच्या कलमांचा उपयोग स्वर्थासाठी करताना घटनेचीच पायमल्ली होतेय्. ज्या संकल्पनेने राज्यसरकारे गठीत होतात ती गेली २५-३० वर्षे आपल्या राज्याचा डोलारा सांभाळत नाहीत. म्हणजेच काहीतरी चूकतंय. त्या त्या राज्यातील व्यक्तींच्या उपजिविकेचा प्रश्न तिथली सरकारे का सोडवत नाहीत? नोकरीचा प्रश्न भेडसावत असल्यास लाकसंख्या आटोक्यात आणायचे प्रयत्न करायचे. नव्हे तसा कायदाच करायचा! तुमच्या राज्यात समस्या आहे म्णणून किती वर्षे परप्रांतावर आक्रमण करणार? संकटकाळात कोणाच्या घरी गेल्यास एकदा मदत मिळेल, दुसऱ्यांदा मिळेल पण तिसऱ्यांदा तो आपलं घर सांभाळेल. पण इथे तर वामनाने जसे तीन पावलाना बळीचे राज्य घेतले तसाच किस्सा होऊ पाहतोय्. केंद्र सरकारच्या उपाययोजना सर्व राज्यात कमी-अधिक फरकाने राबवल्या जातात मग ह्या राज्यांचा बोजा दुसऱ्या राज्यांवर का पडतो? इथल्या लोकांना जर ही लोकं नको असतील तरी का येतात? बरं उद्योगधंद्याचं मानलं! सरकारी नोकरीत ह्या मंडळींना तर जागाच नको. आधी महाराष्ट्रातल्या प्रत्येक बेरोजगाराला नोकरी द्या. उरल्यास ह्यांना बोलवा. उद्योगधंद्यातही तेच काही प्रमाण ठरवून आणि निर्धारित अधिकार देऊनच बाहेरची भरती करावी. उच्च गुणवत्ता इथे ठासून भरली आहे. त्याउपर गरज पडल्यास बाहेरून माणसे आणावीत. अन्यथा महाराष्ट्रातील मुलांनी कुठे जायचं?

आणि सगळ्यात हास्यास्पद म्हणजे अखंड भारताच्या गप्पा मारणारे, महाराष्ट्रात यु.पी. बिहाऱ्यांवर होणाऱ्या? तथाकथित अत्याचारांवर तोंडसुख घेणारे 'सा रे ग म प' वाले अधिकारीगण स्वत:च दुतोंडी होऊन उघडे पडतील. कारण प्रांतवाद हेच जोपासतात, बंगाल के.....' 'बिहार के.....', उत्तर प्रदेश के.....', 'दिल्ली के.......', ''छत्तीसगड की..........,' 'आंध्रा से............', , 'मध्यप्रदेश से..........', 'गुजरात से.............', 'मुंबई महाराष्ट्र से..........' आणि पुढे मग स्पर्धक 'आपापल्या' भाषेत 'आपल्या' लोकांना जिंकवायचे आव्हान करतात. जय हो!

## ।। कऱ्हाडे ।।

**भा. द. काजरेकर(सभासद क.ब्रा.संघ बडोदे )**

आम्ही कऱ्हाडे तुम्ही कऱ्हाडे आपण सर्व आहोत कऱ्हाडे।
आली आपली वेळ म्हणोनि एकत्र सारे होऊं या गडे।।
आतां करूं संवाद आणि करू दृढ संवादिनाची झडे।
आपआपल्या परिवारासाठी करू पुरूषार्थ चहू कडे।।
आदर्श आपले ब्रह्मत्वाचे होऊ द्या घरोघरी त्याचे धडे।।
आणि दिव्य भवितव्यासाठी शिंपडु सामाजिक क्रांतीचे सडे।।
आज सोडूया आळस अविद्या ज्यामुळे कर्तव्याचा विसर पडे।
आहे सुदैव पाठिशी चला करू समृद्ध आपला संघ कऱ्हाडे ।।

आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा?
# विभिन्न क्षेत्रातील निरामय प्रसिध्दी लाभलेले कऱ्हाडे

**अवधूत हर्डीकर**

**आध्यात्मिक क्षेत्र आणि वेदविद्या या क्षेत्रातील नामवंत कऱ्हाड्यांची माहिती या अंकापासून 'संपर्क'च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करीत आहोत.**

अनेक क्षेत्रांमध्ये प्रथम म्हणून मान्यवर कऱ्हाडा व्यक्तिमत्वांचा परिचय आपण आता करुन घेणार आहोत. ही माहिती करुन देणारा कुजबुजीच्या स्वरुपात, अनेकांच्या टीकेचा विषय होतो. कौतुक तर कोणत्याही कोपऱ्यातून नसते. त्यामुळे अनेकदा वाटते की या माझ्या समाजाला सुद्धा द्वेषाची लागण झालेली आहे का काय? तसे किंचीतसे मला वाटले तरी मी केव्हाही या लेखनातून निवृत्ती घेईन. रत्ने केवळ निर्माण होऊन भागत नाही ती आमच्या जवळ अधिक मोलाची आणि मानव्याला जवळ करणारी आहेत. याचे स्मरण, ज्ञान, माहिती असावी लागते. आपल्याकडे प्रत्येक कऱ्हाडा ब्राह्मण संघाने, निदान त्यांच्या कार्य क्षेत्रांमध्ये असलेल्या नामवंत गुणवत्तांची त्यांच्या योगदानासह माहिती असलेली डिरेक्टरी जवळ बाळगणे, हे एक कार्य म्हणून हातात घ्यायला हवे आहे; आणि अशा गुणवंतांचा परिचय करून देणारे लिखाण सतत लोकांसमोर आणणे आवश्यक आहे. निदान प्रत्येक घराने आपल्या घरातल्या गुणवान व्यक्तींची माहिती लिखित स्वरूपात जपून ठेवणे व राखणे हे आवश्यक असते.

१) आता ज्यांचा परिचय आपण करून घेणार आहोत ते त्याच्या त्यांच्या क्षेत्रात सर्वप्रथम होते. यांचा परिचय ही व्यक्ती अधिक मोठी का ती व्यक्ती अधिक श्रेष्ठ? तसेंच काळाच्या ओघाने ही आधीची व ती नंतरची अशा प्रकारचा विचार न करता सामान्यपणे आपल्या वेबसाईटवर असलेलाच क्रम येथे अनुसरित आहे. www.thekarhaadaa.org ही सर्वच व्यक्तिमत्वे आम्हाला वंद्य आहेत. आता क्रमशः यांचा परिचय घेऊ'

१– संस्कृत करिता त्यावेळच्या मॅट्रिकच्या परीक्षेमध्ये पहिला व दुसरा येणाऱ्याला दरमहा अठरा व बारा रु. अशा दोन स्कॉलरशिप इ.स. १८६५ पासून सुरू झाल्या. ही स्कॉलरशिप बहुमोल होती. त्यावेळी साधारणपणे एकतोळा सोने अठरा रुपयांत यायचे आणि या पैशामध्ये एका विद्यार्थ्याचा चरितार्थ उत्तम चालायचा. स्कॉलरशिप सुरू झाल्याच्या पहिल्याच वर्षी श्री. यशवंत वासुदेव आठल्ये, या रत्नागिरीच्या विद्यार्थ्याने ती पहिली स्कॉलरशिप पटकावली.

२. श्री शशिकांत काशिनाथ आठल्ये तथा आठल्ये गुरुजी हे सतत पंधरा वर्षे आमदार म्हणून निवडून आलेले गृहस्थ लोकप्रतिनिधी कसा असावा याचा उत्तम नमुना होता. त्यावेळी रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे नव्हते. ज्या भागातून आपण निवडून येतो, तोच तालुका नव्हे तर पंधराशे गावांचा त्यावेळचा संपूर्ण रत्नागिरी जिल्हा पायी फिरून काढलेला पहिला लोकप्रतिनिधी. खाकी चड्डी व शर्ट हाच वेष. आमचे गुरूजी अत्यंत नि:स्वार्थी, तत्त्वांना चिकटून असलेले, कोणत्याही व्यक्तींचे खोटे स्तोम माजवणाऱ्या संस्कृतीला शरण न जाणारे, जबाबदारीची पूर्ण जाणीव असणारे, त्यांचा प्रमाणिकपणा हाच त्यांचा वीक पॉईंट होता. लोकांचा नेता बनण्यासाठीचे सर्व आवश्यक गुण त्यांचेजवळ एकवटले होते. एस्.टी.वर बोजे चढविण्यापर्यंत त्यांनी आमदार असतांनाही गरिबांना मदत केली. माझ्या साहित्यातला असा आमदार पहिलाच! आणि एकमेव!

३) एकमेव भास्कर पहिला स्वरभास्कर भास्कर बुवा बखले–

– संगीताच्या क्षेत्रांमध्ये 'प्रसिद्ध घराणी' ग्वाल्हेर, जयपूर व आग्रा. यातल्या एकेका घराण्याची स्वतंत्र शैली! अभ्यास करतांनाच अनेकांचे जीव मेटाकुटीला येतात. मग त्याच घराण्याचा गर्व करून जीवनभर रहातात. स्वत:च्या घराण्यांचे अभिनिवेश बाळगून इतर घराण्यांचा द्वेष सुरू होतो. भास्करबुवा ही पहिली व्यक्ती की ज्यांनी या तिन्ही घराण्यांची शैली मोठ्या कष्टाने, मेहनतीनें एकाच जीवनात आत्मसात केली. घराण्यांच्या क्षेत्राच्या बाहेर जाऊन संगीताचे सौंदर्य–सर्वसामान्यांच्या दारापर्यंत आणले. ते नसते तर आजचे मराठी नाट्यसंगीत म्हणून जे काही आहे, त्याचा जन्मच झाला नसता. केशरबाई केरकर, बालगंधर्व, कृष्णराव फुलंब्रीकर, गोविंदराव टेंबे, बापू साहेब केतकर असे नामांकित विद्यार्थी त्यांनी घडविले. खऱ्या संगीत तज्ञांनी त्यांना देवगंधर्व म्हटले. पु.ल. देशपांडे यांनी त्या काळच्या प्रसिध्दि लाभलेल्या गवयांच्या गुणांची चर्चा करून भास्कर बुवा बखल्यांचे, त्यांच्या गुणांचे उदंड कौतुक केले. त्यांना श्रेष्ठ ठरविले. वामनराव देशपांडे यांचे घराण्यांनीही त्यांना श्रेष्ठ गायक मानले. यांनीच राजे राजवाड्यांकडे बंदिस्त असलेली गायकी सार्वजनिक केली आणि गायकीतल्या सौंदर्याचा आणि स्वरांच्या श्रीमंती जोपासनेचा परिचय करून दिला.

४) श्री.सी.एस. बावळे, I.C.S.

भारतीय रेल्वेचे पहिले कमिशनर म्हणजे मुख्य; सी.एस. बावळे हे एम्.सी.एस. बुद्धिमान गृहस्थ होते.

५) डॉ कमला भागवत–

भारताची पहिली स्त्री– शास्त्रज्ञ डॉ. कमलाा भागवत. कशेळीच्या ख्यातनाम भागवत घराण्यातली. गेली ९०० वर्षे. हे घराणे विद्वत्तेकरीता प्रसिद्ध आहे. डॉ. कसला भागवत, दुर्गा भागवतांची बहीण! राजाराम शास्त्री भागवतांच्या घराण्याच्या त्यांनी सोहनींशी विवाह केल्याने नंतर त्या कमल सोहनी म्हणून प्रसिद्ध झाल्या. तरी त्यांचा वंशदाय कऱ्हाडाच होता. यांचे पूर्वज पं गोविंदजी भागवत हे अध्यात्म व योगविद्या संपन्न पुरुष! त्यांचे दर्शन घेण्यासाठी शियाहार राजा भोज ११९३ साली कशेळीत आला होता. डॉ. कमला भागवत दि. ४.९.१९९७ ला त्या निवर्तल्या.

६) श्री. भा.रा. भागवत : मराठीमध्ये लहान मुलांकरिता रोचक लिखाण करणारे म्हणून भा.रा. भागवत प्रसिद्ध होते. पावणे दोनशेच्या वर लहान मुलांसाठी पुस्तके लिहिली. लहान मुलांचे साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांच्या पहिल्या संमेलनाचे भागवतच अध्यक्ष होते. फास्टर फेणें हा त्यांनी निर्माण केलेला काल्पनिक लहान मुलांचा हीरो लोकाप्रिय झाला.

७) श्री. सखाराम हरिश्चंद्र भाटवडेकर तथा सावेदादा :

ख्यातनाम स्टिल फोटोग्राफर आणि त्यासाठीची साधने उपलब्ध करून देणारे साबेदादा यांचा स्टुडिओ मुंबईच्या केनेडी ब्रिजजवळ होता. पहिली भारतीय फिल्म तयार करणारे ही त्यांची ख्याती. नोव्हेंबर १८९९ मध्यें त्यांनी 'द रेसलर' व 'मॅन अँड मंकी' अशा दोन डॉम्युमेंटरीज प्रसारित केल्या.

८) डॉ. आर्.जी. भाटवडेकर – 'भारतीय रेल्वेचा हिरा'

ख्यातनाम धातुविद्या विशारद आणि भारतीय धातुविद्येसंबंधी विचार करणारी पहिली असोसिएशन स्थापन करणारे भाटवडेकर, लंडनच्या रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ मेटलर्जीचे फेलो होते. भारतीय रेल्वेच्या पब्लिक सर्व्हिस कमीशनचे ते पहिले अध्यक्ष होते. टाटा कंपनीचे ते धातुविषयक समुपदेशक सल्लागार तसेच किर्लोस्कर कंपनीचेही! भारताच्या दूरदृष्टीच्या गुणास प्रधानमंत्र्यांनी –लाल बहादूर शास्त्री यांनी भाटवडेकरांना भारतीय रेल्वेचा हिरा म्हणून गौरवले.

९) पूज्यश्री चक्रपाणी तथा चांगदेव राऊळ – फलटण, द्वारका

आश्विन शुद्ध नवमी, सन ११२१ या दिवशी चक्रपाणी राऊळ यांचा जन्म फलटणला झाला. 'फलेठाणी कराडेचिया ब्राह्मणाचिया घरी जन्म जाहला.– हा लीळा चरित्र एकांक या प्रख्यात ग्रंथातली पहिलीच ओवी. संतश्री ज्ञानेश्वर महाराजांपूर्वी कांही दशके आधी त्यांचा जन्म झाला. हे महान योगी, पहिले कृतिशील संत, महानुभाव पंथ संस्थापक, 'बावन्न महा योग्यांचे परम–गुरू! यांनी अनेकांना अध्यात्म व योगविद्येत दीक्षा दिली जातिविरहीत समाजाची पहिली कल्पना ज्यांनी हिरीरीने मांडली आणि आचरणात आणली. असा हा सर्वश्रेष्ठ संत आमच्या वेबसाईटवर Karhaadaa inheritance या शीर्षकाखालील लेखात त्यांचे विषयी अधिक माहिती आहे.

१०) श्री. वासुदेव गोपाळ चिरमुले – सातारा.

'सर्वदृष्टीने' सद्गुणांचे आदर्श म्हणून, धाडस आीण जोखीम घेऊन कार्य करणारे, क्रांतदर्शी आणि विकासाची सत्त्वगुणसंपन्न स्वप्ने प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची दुर्दम्य शक्ती, अथकपरिश्रम, अमर्याद उत्साह, चिकाटी आणि सूक्ष्मग्राही लखलखीत बुद्धिमत्ता यांच्या या ऐश्वर्यशाली गुणांमुळेच स्वत:चे नाव धन्य केलेली, भांडखोरपणा–उणीदुणी काढणे, कट–कारस्थाने करून एखाद्याला शत्रू समजून त्याला निष्भ्रम करणे या सारख्या गोष्टींमध्ये रस नसलेली अशी उच्च मानवीय गुणवत्ता लाभलेली अनेक व्यक्तिमत्त्वे कऱ्हाडा समाजात होऊन गेली. त्यातलें हे एक रत्न! विमा व्यवसायात कार्यरत असलेली पहिली विश्वासू विमा–कंपनी आणि युनायटेड वेस्टर्न् बँकेसारखी बँक यांनी निर्माण केली. सेमिनार मध्ये बोलण्यातच न राहिलेला असा वस्तुस्थितीत असणारा खरा–खुरा आर्थिक विकासाचा पाया दूरदृष्टीच्या या व्यक्तीने घातला. यांच्या नावाचा एक लाख रुपयांचा वार्षिक पुरस्कार दिला जातो. त्या मानकऱ्यात डॉ. मनमोहन सिंग, डॉ. रघुनाथ माशेलकर अशा नामवंत व्यक्ती आहेत. बाह्यवेष एकदम साधा पण अंत:करण हिमालयाची उंची गाठलेले असे हे व्यक्तिमत्त्व!

११) श्री. सखाराम गणेश देऊस्कर, कलकत्ता (१८६९–१९१२)

'हिपवाद' या कलकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या बंगाली भाषेतल्या दैनिक वृत्तपत्राचे संपादक – बंगाली न्यूज पेपरचे पहिले महाराष्ट्रीय संपादक. मूळचे राजापूर तालुक्यातल्या भालावली गावचे हे असावेत. कलकत्त्याच्या मान्यवर लोकांतले एक अग्रणी .

आपल्यातली एक सद्गुणी व्यक्ती दूर बंगालमध्ये, कलकत्त्याला बंगाली – दैनिकाची संपादक म्हणून कार्य करीत होती, ही अनेकांना बातमी वाटेल... पण अशा अनेक कर्तबगार – सद्गुणी कऱ्हाडा व्यक्ती महाराष्ट्राबाहेर उत्तरेकडे सन्माननीय, आदरणीय ठरल्या त्या त्यांच्या आंतरिक सद्गुणांमुळेच जातां जातां अशा लोकांची केवळ नामावळी बघू! ही नावे वाचूनचं आपण रोमहर्षित होतो. कऱ्हाडा समाजातील अनेक नामवंत उत्तर भारतात अनेक ठिकाणी पसरलेले दिसतात. तिथल्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विचारांच्या उन्नयनाला सर्व काळासाठी आणि कोणत्याही देशात, व्यक्तीला आतूनच श्रीमंत करणाऱ्या त्यांच्या पिढीजात संपन्न विचारांमुळे महाराष्ट्रा बाहेरही सत्कीर्ती मिळवून ती आजतागायत राखणारे हे सर्व लोक होते. सर्व काळासाठी, कोणत्याही देशामध्ये टाळता आले तर बरे; अशी कीर्ती या लोकांची कधीही नव्हती.... अशा अनेक लोकांपैकी काही थोड्याच लोकांची 'पुण्यस्मरणे' आज येथेच करू.

भारतरत्न श्री. गोविंद वल्लभ पंत पराडकर हे गढवालचे. भारताचे गृहमंत्री म्हणून होते, पण त्याही पूर्वी ते पूर्वीच्या बृहत् उत्तर प्रदेशाचे

*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

मुख्यमंत्री म्हणून होते. त्यावेळच्या गुजराथसह महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. बाळ गंगाधर खेर अशा दोन श्रेष्ठ व्यक्ती. कऱ्हाडा समाजाने एकाच वेळी दोन मोठ्या राज्यांच्या मुख्यमंत्री म्हणून दिल्या आहेत. त्यावेळी लाख–दीड लाख एवढीच एवढीच कऱ्हाडा समाजाची लोकसंख्या होती. एका छोट्या समाजाचे गुणात्मक आणि संवादात्मक मोठे ठरलेले योगदान! हे पराडकर घराणे मूळचे कोतापूर – ता. राजापूर इथले. जयराम हा त्यांचा पूर्वज उत्तरेस गेला आणि गढवालला स्थायिक झाला.

– बनारसला 'आज' या हिन्दी दैनिकाचे सर्वलोक मान्यवर असे संपादक, बाबुरावजी पराडकर, ज्यांच्या नावाचें 'पराडकर–भवन' बनासर रेल्वेस्टेशनच्या बाहेर डौलाने उभे आहे, ते बनासरचे. श्री. लक्ष्मण नारायण गर्दे हे तसेच एक नामवंत पत्रकार. गोरखपूरच्या कल्याण या मासिकाच्या दहाव्या वर्षी म्हणजे १९३५ साली प्रकाशित झालेला योग विषयावरचा, विशेषांक त्यांनी संपादित केलेला आहे. उत्तर प्रदेशाच्या, हिन्दी पत्रकारिकेत ज्यांना 'त्रिमुनी' म्हणजे 'तीन ऋषी' म्हणून सन्मान आहे. त्यातले दोघे 'पराडकर' आणि 'गर्दे' हे कऱ्हाडा ब्राह्मण होते. तिसरे उत्तर प्रदेशचेच एक गृहस्थ होते त्यांचे नाव अंबिका प्रसाद वाजपेयी हे तिथेही श्री सखाराम गणेश देऊस्करांचे शिष्य हे तिथेही 'संपादकाचार्य' म्हणून हिन्दी पत्रकारितेत गौरविले जातात. राजस्थानात 'कोटा' या शहरातला 'राष्ट्रदूत' या प्रख्यात हिंदी दैनिकाचे संपादक श्री. आनंद लक्ष्मण खांडेकर, यांनी काल–परवां पर्यंत ही परंपरा चालवली. झाशी संस्थानचे अधिपती नेवाळकर व त्यांचे घराणे; तांबे घराणे, ग्वाल्हेरचे गुण्ये हे घराणे, गुणा – राजस्थान इथले डॉ. ताटके या प्राण्यात सर्जन असलेल्या व्यक्तीचे घराणे; इंदोरची. सरवटे आणि मोघे ही घराणी, कानूपरचे ख्यातनाम इतिहासकार श्री. श्रीनिवास हर्डीकरांचे घराणे, जबलपूरचे नवाथे, गोळविलकर, सागरचे सीतारामपंत खेर, सुधाकरराव मुळ्ये, हर्डीकर, जायदे चांदोरकर सुभेदार ही घराणी प्रसिद्ध आहेत. प्रा. नारायणराव कृष्ण शेजवळकर आणि त्यांचे पुत्र श्री, विवेक (सध्या)– असे– दोघेही पिता पुत्र ग्वाल्हेरचे महापौर. आजही इन्दूरचे महापौर श्री. मोघे म्हणून आहेत. इंदोरची करकरे, सरवटे, भवाळकर, मोघे घराणी, मुकुंद सखाराम नेवाळकर हे मध्यप्रदेशचे विद्यानसभा अध्यक्ष होते. पद्मभूषण डॉ. शालिनीताई मोघे या ख्यातनाम समाजसेवक सरवटे यांच्या कन्या! मराठी काव्याला पुलकीत करणारी तरल भाववृत्ती, ओजस्विता, गेयता, वैचारिक समृद्धी आशयघनता, अशा अनेक सद्गुणांच्या अलंकारांनी पूर्ण नटलेली कुलवधू म्हणून सर्व प्रथम आधुनिक काळात पुढे आणले– ते भास्कर रामचंद्र तांबे, काळेले, हे ग्वाल्हेरचे – मध्यप्रदेशातले हेमचंद्र खांडेकर हे पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. श्री. लक्ष्मण आत्माराम काटदरे हे कम्युनिस्ट पार्टीचे मान्यवर पुढारी, सरदार माधववराव किबे हे मान्यवरही इंदोरचे पद्मभूषण व्ही.एस.सरवटे हे भारतीय घटना समितीचे एक मान्यवर सभासद होते. अलाहाबादचे पित्रे घराणे मोठे आहे. पं. वासुदेव भट्ट कोवई (इ.स.१०३१), पै. भैरवभट्ट कोवई (इ.स. १५८२) पं. कृपण भट्ट बखले (ई.स.१५८३), पं नारायण भट्ट आडर्ये, (इ.स. १६४०)... या असामान्य कार्यकर्तृत्त्वाच्या पंडितांनी आपल्या स्वयंभू गुणांमुळे आणि लखलखीत पांडित्यामुळे बनारसच्या पंडितसभेमध्ये मानाचे स्थान निर्माण केले. धर्मसभेमध्ये, या लोकांच्या अर्ध्वयूची सही संमती पत्रांत, तसेच निर्णयपत्रामध्ये आवश्यक होती. नंतर महाराष्ट्रातून बनारसकडे गेलेल्या अनेक ब्राह्मणांना यांचा आधार वाटायचा. हिमाचल प्रदेशामध्ये संन्यस्त वृत्तीच्या डॉ. इंदुताई टिकेकरांचे कार्य एवढे मोठे आहे, की प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुंदरलाल बहुगुणा यांनी पुणे येथे टिळक स्मारक मंदिरामध्यें दिनांक २८ ऑगस्ट २००० या दिवशी आपल्या भाषणात सांगितले, की– 'डॉ इंदुताई टिकेकर यांचे नि:स्वार्थीपणाने चाललेले सामाजिक कार्य जवळून पाहिल्यानंतर असे वाटते की 'महाराष्ट्र आजही जिवंत आहे!'.... ही सभा डॉ. इंदुताई टिकेकरांविषयी नव्हती. या सभेतला एक श्रोता मी होतो.

– बनारसच्या नागरी प्रचारिणी सभेचे श्री. माधवरावजी सप्रे, हे रामपूरचे घराणें. बनारसला आणखी एका सप्रे यांची वेदपाठशाळा होती. न्यायदानाच्या क्षेत्रामध्ये जस्टिस तांबे, जस्टिस मुळ्ये, जस्टिस गोळवळकर पितापुत्र दोघेही, जस्टिस हार्डीकर, जस्टिस देव, जस्टिस गोळविलकर, जस्टिस प्रकाश नावलेकर अशी सर्व मंडळी याच समाजाची पण उत्तरेकडची! अनेक वर्षापूर्वी उत्तर भारतात स्थानिक झालेली!

– श्री गणेश वासुदेव मावळंकर– हे सन्मान्य लोकांमध्येही श्रेष्ठ असलेलें व्यक्तिमत्त्व– त्यावेळच्या महाराष्ट्र गुजराथ या विशाल राज्याच्या विधान सभेचे पहिले सभापती होते. नंतर ते लोकसभेचे पहिले सभापती झाले. श्री. सीतारामपंत खेर हे उत्तरप्रदेश विधान सभेचे अध्यक्ष होते. श्री. पुरूषोत्तम मावळकर, हे श्री. ग. वा. मावळकरांचे चिरंजीव! तसेच श्री. के.सी. तथा कृष्णचंद्र पंत हे गोविंद वल्लभपंत पराडकरांचे चिरंजीव... पितापुत्र लोकसभा सदस्य झालेली जी काही थोडीच कुटुंबे त्यातले हे! आजही स्वानंद किरकिरे, तरल कल्पनांचा. भावुक कवि म्हणूनच हिन्दी काव्य–गीत प्रांतात नाव करून आहे. ॲवार्डस मिळवतोय. कलकत्त्याचे श्रीकांत बाक्रे प्रसिद्ध शास्त्रीय गायक होते. पं. गुण्ये यांच्या नावावर वार्षिक संगीत समारोह अलाहाबादला भरतो. पं उदय भवाळकर हे तरूण गवई धृपद–धमार गायक म्हणून प्रसिद्ध आहेत. श्री. गणेश गोपाळ आठल्ये या आद्य क्रांतीकारकांपैकी एका तरूणाने कलकत्ता येथे बाँब बनविला होता. इंदूरच्या तात्यासाहेब सरवटे यांच्या इतर दोन्ही मुली डॉ. मालिनी हरमळकर व कालिंदी सरवटे या स्वातंत्र्य चळवळीतल्या अग्रेसर कार्यकर्त्या. उज्ञयिनीचे पद्मभुषण डॉ विष्णुपंत वाकणकर यांनी सरस्वती नदीचा शोध लावला. श्री. गोविंदराव नानल, हे हैद्राबाद काँग्रेसचे नेते व त्या चळवळीचे अर्ध्वयू होते. हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अध्यक्ष होते. इंदोरचे विष्णू चिंचाळकर हे ख्यातकीर्त नाट्यधर्मी. त्यांचे अनेक शिष्य हिन्दी–नाट्यभूमी गाजवत आहेत.– तुषार खांडेकर., दमयंती तांबे, करकरे हे क्रीडांगण गाजवत आहेत.

– मित्रानो!.... महाराष्ट्राबाहेर दूरवर राहूनही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यक्षेत्रात अग्रेसर असलेली ही काही नांवे म्हणजे–पाण्यामध्ये हिमनग फक्त एक दशांशवर दिसतो. बाकी नऊ दशांश पाण्याखाली असतो तसे आहे. खूप खूप नांवे आहेत. मध्यप्रदेश, गुजरात, ओरिसा, बंगाल, बिहार, हिमाचल प्रदेश... अशा

**(पुढील मजकुर पान नं. १७ वर पहा)**

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

SHREE ANNAPURNA CATERERS

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# पसायदानाचा सामाजिक आशय

**प्रभाकर गोविंद घाटे**

महाराष्ट्राच्या मंगल भूमीने जन्म दिलेल्या विश्ववंद्य ज्ञानेश्वरांची पुण्यतिथी नुकतीच कार्तिक वद्य त्रयोदशीला साजरी झाली. त्या निमित्त भाविकांकडून आणि व्यासंगी विद्वानांकडून अगणिक श्रद्धा सुमने वाहिली गेली. सुमारे सातशे वर्षांचा प्रदीर्घ अवधि लोटला तरी सर्वभक्षक काळ त्यांच्या पावन स्मृतीला स्पर्श करण्यास धजावला नाही; जनमानसांतील आदरभाव ओसरला नाही. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी त्याने घेतलेली संजीवन समाधी त्यांच्या साहित्याच्या, विचारसंपदेच्या, जीवनविषयक मूल्यांच्या बाबतींत अक्षरश: संजीवन ठरली आहे.

मानवतेच्या या महान शिल्पकाराच्या, जीवनाच्या भाष्यकाराच्या असामान्य नेत्रदीपक यशांचे, अमाप लोकप्रियतेचे त्यांच्या नेमक्या कोणत्या पैलूला द्यावें, हे सांगणे मोठे कठीण आहे. ज्ञानेश म्हणजे सद्‌गुणांचे संमेलन, सत्प्रवृत्तींचे संकलन. जीवनाच्या अंग प्रत्यंगाला स्पर्श करणारे ते तत्त्वज्ञ होते, उज्ज्वल प्रतिभेचे धनी, शब्दसृष्टीचे ईश्वर, उपादृष्टांतदि अलंकारांचे कुबेर, रसगंगाधर असलेले महान् कवि होते, याबद्दल दुमत होणे असंभव आहे. तरीही हे दुर्लभ गुणदेखील फिके वाटावेत असे ठळकपणें नजरेंत भरणारे दोन विशेष म्हणजे सर्वांवार मायेची पांखर कराणारं त्यांचं मातृहृदय आणि विश्वकल्याणासाठी चंदनासारखं झिजणारें, कारूण्यानें ओथंबलेले त्यांचे संतत्त्व. समाजाच्या सुखदु:खांशी समरस होऊन, दु:खभार हलका करून सर्वांना सुखी करण्याचा आटोकाट प्रयत्न करणें ही संतांची कसोटी. निम्न भरलिला विणें। पाणी ढळोचि नेणें। तेवी श्रोता तोषोनि जाणें। सामोरिया।। हा संतांचा बाणा. ज्ञानेशांच्या जीवनांतील चमत्कारांवर विश्वास ठेवा अगर ठेवूं नका; पण रेड्याप्रमाणें वेध मुकाटपणें हाल अपेष्टांचे व अत्याचाराचे जाचक फटके सोसणाऱ्या दीन दुबळ्यांच्या दु:खांना त्यांनी वाचा फोडली, गतानुगतिकतेमुळें आणि काळाच्या बदलत्या ओघाला इष्ट वळण देणाऱ्या स्वतंत्र विचारांच्या अभावी शाश्वत मूल्यांचे विस्मरण होऊन भिंतीप्रमाणें जड बनलेल्या समाजांत गतिमानता आणण्याचा, स्वार्थाच्या अफूच्या गोळीमुळें झोपीं गेलेल्या माणसांतला माणूस जागा करण्याचा त्यांचा प्रयत्न कोणालाही नाकारता येणार नाहीं. संतांची जीवनाभिमुखता वादातीत आहे; त्यांचे साहित्य, प्रत्येक कृति समाजहित तत्परतेतूनच जन्माला येते, सुखद प्रत्यय ज्ञानेशांचे पसायदान वाचतांना, ऐकतांना येतो; मनन केल्यावर तर तो हृदयाला भिडल्यावाचून रहात न सर्वांनाच सुपरिचित असलेलें पसायादान म्हणजे ग्रंथराज ज्ञानेश्वरीचा समारोप, भरतवाक्य, जीवनाच्या तपश्चर्येतून निर्माण झालेली, प्रणिमात्रांच्या सेवेचा संकल्प करणारी विचार वैपुण्याने नटलेली, दुष्टांचा संहार करणाऱ्या सुदर्शन चक्रापेक्षा किंवा वीरश्रेष्ठ अर्जुनाच्या शरसंधानापेक्षा दुष्टांचा हृदयपरिवर्तनावर भर दिल्याकारणानें अधिक प्रभावी ठरलेली, जीवनाची अवघड प्रमेयें मातेच्या ममतेनें, रसाळ वाणीने, विलक्षण वाक्यातुर्यानें सर्वसामान्यांना 'सुखिया' करीत समजावणारी ज्ञानेश्वरी ही जीवनयोग सांगणाऱ्या गीतेवरील अद्वितीय टीका तर आहेच, पण उदात्तता, भव्यता दिव्यता, सौजन्य, कारूण्य, मांगल्य यांचा तो अपूर्व संगम आहे. आणि त्यांतील पसायदान हा ग्रंथमंदिरावर चढविलेला मनोवेधक कळस, उत्कट विचार–भावनांचे अजिंक्य शिखर.



पसाय हें प्रसाद संस्कृत शब्दाचे कर्णमधुर मोहक प्राकृत रूप. पूजा आटोपल्यावर जो मिळण्याच्या अधिकार सहजासहजी प्राप्त होतो तो प्रसाद ज्ञानेश देवाजवळ मागतात. हें मागणें तुमच्या आमच्यासारखं क्षुद्र नाहीं, स्वार्थानं लडबडलेलें नाही. ते आगळं आहे, लोकविलक्षण आहे, अनन्यसाधारण आहे, कारणे तें एका व्यक्तीसाठी नसून अखिल विश्वासाठी आहे. हें मागणं म्हणजे ''अवघाचे संसार सुखाचा करीन / आनंद भरीन तिन्ही लोक'' असा संकल्प करणाऱ्या महामानवानें विश्वाला आधारभूत असलेल्या शक्तीशी केलले हितगुज आहे. व्यक्ति आणि समाज, व्यवहार आणि अध्यात्म, प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधल्याशिवाय जीवन सफल होणें दुरापास्त आहे अशी नि:संदिग्ध भूमिका असलेल्या ज्ञानेश्वरांच्या पसायदानांतून मानवतेच्या संगोपन–संवर्धनासाठी अत्यावश्यक असलेल्या विचारांचा ठसा कसा स्पष्ट उमटला आहे, सद्‌भावनांचा सुगंध कसा दरवळत आहे याचा धांवता मागोवा प्रयत्न करूं या.

आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मग द्यावें। पसायदान हें।। या पसादानाच्या पहिल्या ओवींतील पहिला शब्द ''आतां'' हा ही रचना, हे भाष्य, नव्हे मानवधर्माचें संकीर्तन गुरूकृपेनें सिद्धिस गेल्याचा सूचक आहे. त्यानंतर येणारे शब्द ''विश्वात्मकें देवो'' म्हणजे उत्कृष्ट गोलंदाजाच्या चेंडूवर मारलेला उत्तुंग, गगनचुंबी, प्रेक्षणीय षट्कार. त्याने गाठलेल्या उंचीकडे पाहून मन हरखतं, भान हरपतं–ज्ञानेश ''उत्कट भव्य तितुकें घ्यावें। मिळमिळित अवघेचि टाकावे'' या पंथाचे पुरस्कर्ते. त्यांचा देव केवळ मूर्तीत साठवलेला नाहीं कीं देवळांत बंदिस्त नाही; तो आहे विश्वात पसरलेला, अणुरेणूंत

**(पुढील मजकुर पान...१९ वर)**

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. Max Distance between spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range<br>Vertical adjustment of arm | rpm<br>mm | (8)75-1850<br>533 | (8) 80-2310<br>660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in

*With Best Compliments From...*

# J.P.F. METACAST PVT. LTD

**Manufacturers of** C I & S G I, machined & unmachined Castings.
Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Component & Intricate Castings, Cylinder Heads.

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

An ISO 9000:2008 COMPANY
1ST ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI - 1998
Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007

**Commendation Certificate in Small Scale Manufacturing Industry**

695C, Udyambag P.O., Belgaum - 590 008
Ph. : 0831-2440664, Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com Website : www.jpfmetacast.com

# श्रावणी

**श्रीप्रसाद ग. नवाथ्ये.**

त्रैवर्णिकांना जे संस्कार नित्य आहेत, त्यात श्रावणीचा समावेश होतो. ऋग्वेद्यांनी श्रावणशुद्ध पक्षात – श्रवण नक्षत्र, पंचमी आणि हस्तनक्षत्र असे जे तीन काल सांगितले आहेत, त्यात श्रवणनक्षत्र हा जो मुख्य काल, तो जर न साधेल तर पंचमी किंवा तीही न साधल्यास हस्त नक्षत्र (अशी योजना जाणत) हे कर्म पूर्वाहणवगळी करावे.

श्रावणी म्हणजे नुसते नवीन यज्ञोपवीत धारण करण्याचे एक धार्मिक कार्य नसून हे वेद उत्सर्जन व वेद उपाकर्म संस्कार करण्याचे अनुष्ठान आहे.'उत्सर्जगश्वाप्युपाकर्म महायज्ञाष्च नित्यश:। वेद उत्सर्जन म्हणजे आपण काही दिवसाकरिता वेदाध्ययन स्थगित ठेवणे व जाहीर करणे व वेदउपाकरण म्हणजे स्थगित ठेविलेले वेदध्ययन–अध्यापन यांचा आरंभ केल्याचे जाहिर करणे. उत्सर्जनाचा काल पौष अथवा माघ शु पौर्णिमा हा असून उपाकर्माचा काल श्रावण महिना आहे काही कारणाने श्रावण मासात हे कर्म न झाल्यास भाद्रपद मासातही करावे. पौष किंवा माघ दिवशी करावे, उत्सर्जन पौषमासे उपाकर्म दिने पिवा ।

सूत्रकाळी प्रधान होम व ब्रम्हयज्ञ ही दोन कर्मेच होत असत. उत्सर्जन व आकर्म होमा मध्ये प्रत्येक मंडळाच्या पहिल्या व शेवटच्या ऋचेने होम करावयाचा असतो. असा एकंदर वीस ऋचांचा होम होत असतो. कारण ऋग्वेद संहितेत दहा हजार पाचशेपेक्षा अधिक ऋचा आहेत. त्या सर्व दहा मंडला मध्ये कमी अधिक संख्येने विभागाल्या आहेत. उत्सर्जन होमाच्या वेळी चरू (भात) व उपाकर्म होमाच्यावेळी दधिसक्तु (दह्यात कालविलेले सातूचे पीठ) चे होम करून सर्व मंत्राचे उपाकर्म करावयाचे असते.

गृह्य करिकेमध्ये स्नान, ऋषिपूजन यांची भर पडली आहे. प्रयोगपारिजात कारांनी आणखी यज्ञोपवीत हवनाचाही संग्रह केला आहे. सांप्रत या कर्माची फारच वाढ झाली आहे. पंचगव्यप्राशन, स्नानविधी, शांतिसूक्ते, पर्जन्यसूक्ते यज्ञोपवीतधारण सभादीपदान वगैरे. हा संस्कार प्रत्येकाने करणे अवश्य आहे. कारण उत्सर्जनच वेदांना उपाकरणमेवच । अकृत्वा वेद जप्पेन फलं नाप्नोति मानव:।

स्नानामध्ये भस्मस्नान, गोमयस्नान, मृत्तिकास्नान व शुद्धजलस्नान करावे हे नसेल दर्भाद्वारे शरीरावर मार्जन करावे. नंतर उपाध्यायाने सप्तऋषींची पूजा करावी व जमलेल्या मंडळींनी सप्तऋषींना गंधफुले वहावीत. त्यानंतर ऋषितर्पन व पितृतर्पण करावे व नंतर उपाकर्म करावे. त्यात २१ वेळा सातूच्या पिठाच्या आहुती देवून प्रत्येकाने २ गोळ्या करून पाण्याबरोबर दाताला न लावता भक्षण कराव्या.

नंतर यज्ञोपवीत संस्कार. यज्ञोपवीत हवन स्मृतीतून सांगितले आहे. म्हणून (हुत्वा– दत्वाच धारयेत) यज्ञोपवीत हवन, दान करून धारण करावयाचे आहे.

यज्ञोपवीत (जानवे) हे शास्त्रीय प्रतीक आहे. चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे हे हिंदु धर्माचे महत्वाचे ग्रंथ आहेत. सृष्टीची मूलतत्वे ९६ आहेत. १५ चंद्रकला, १२ मास, ७ वार २७ नक्षत्रे, २५ तत्वे (प्रकृति, पूरुष, महतत्व अहंकार, पंचमहाभूते, पंचविष्णय, पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये व मन एकूण ९६ तत्वे आहेत. मूलतत्वे ९६ असल्याने जानव्याची लांबी ९६ अंगुळे असावी चार बोटे म्हणजे ४ वेद अशी भावना करून याला ६ शास्त्रे + १८ पुराणे बरोबर २४ म्हणून २४ वेढे द्यावेत असे सांगितले आहे. ४x२४ = ९६ जानव्यात ३ पदर असतात आणि प्रत्येक पदर तीन तीन सुतांचा झालेला असतो असे हे जानवे एकूण ९ पदरी असते (नऊ सुती) म्हणून हे जानवे गीतेच्या अठराव्या अध्यायात सांगितलेल्या ब्रम्हकर्माच्या स्वाभाविक अशा ९ गुणांचे प्रतीक आहे. ९ सुतावर नऊ देवतांचे व्यास अर्थात देवस्थापना करावयाची असते.

ॐकार, अग्नि, नाग, सोम, पितर, प्रजापति वायु, सूर्य, विश्वेदेवा अशा ह्या नऊ देवता आहेत. या नवसूत्रीचे तीन पदर (त्रिसूत्री) करावयाचे. हे तीन पदर सत्व, रज, तम या त्रिगुणांचे तसेच जगाच्या उत्पत्ति, स्थिती व लयाला कारणीभूत असलेल्या ब्रम्हा, विष्णू व महेश यांचे प्रतीक आहे. या तीन पदरांना मिळून १ गाठ मारलेली असते तिला ब्रम्हगाठ असे म्हणतात. ही ब्रम्हगाठ अद्‌वैताचे म्हणजे जीव व ब्रम्ह एकच असल्याचे प्रतीक आहे यावरून यज्ञोपवीत किती महत्वाचे आहे हे लक्षात येईल.

ब्रम्हचाऱ्याने एक, गृहस्थाश्रमीयांनी दोन यज्ञोपवीने धारण करावीत. दैनिक कार्याच्या वेळी यज्ञोपवीत डाव्या खांद्यावर व उजव्या हातात घातलेले असते याला सत्य म्हणतात. मानवी कर्माचे वेळी ते गळ्यात माळेसारखे असते त्याला नवीती म्हणतात व पैतृक (श्राद्धादि) कर्माचे वेळी उजव्या खांद्या वर व डाव्या हातात घातलेले असते याला अपसव्य म्हणतात.

पूर्वी हा संस्कार आपल्या स्वत:च्या शिष्यांसह प्रत्येक घरी गृहयाग्नीवर होत असे. त्याचेच सांप्रत थोडे पालटलेले स्वरूप म्हणजे एका ठिकाणी अनेकांनी जमून श्रावणी करणे हे होय। त्यामुळे गृह्याग्नीवर होणारे हे कृत्य सर्वत्र लौकिकाग्नीवर होऊ लागले.

।।शुभं भवतु।।

**निकेत फोटोज्**

**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**

# ‘शब्द’

‘शब्द’ दोन अक्षरी शब्द, किती परवलीचा असतो नाही. पूर्वी जेव्हा आवाजाचं तंत्र उपलब्ध नव्हते तेव्हा मुकपट दाखवायचे तेव्हा अस वाटायचं शब्दावाचून सारे कळले शब्दांच्या पलिकडले.

‘शब्द’ शब्दात किती जादू आहे नाही. लहानपणी आपण पहिल्यांदा बोलायला लागतो. तो सुरवातीचा दोन अक्षरी शब्द ‘आई’ किती अप्रूप वाटतना, आपल्याला या शब्दाच! हळू हळू आपल्या शब्द कोशात भर पडायला लागते. आणि मग आपल्याकडे शब्दांच भांडारच साठते.

शब्दाला अर्थ असतो, शब्दाला मोल असतं, शब्दाला गोडवा असतो, शब्दाला ओलावा असतो, शब्दाला माया असते. शब्दाला किंमत असते, शब्दाला वजन असते. शब्दाला कविता असते, शब्दाला टीका असते, शब्द कटु असतात, शब्द जहरी असतात, शब्दाला काटे असतात, शब्द तिखट असतात, शब्द शस्त्रे असतात, तर सांगायचे तात्पर्य असे की, शब्दांचा उपयोग जो तो आपल्या मती प्रमाणे करत असतो.

काही माणसांच्या जिभेवर निवडुंगाची फडी असते तर काही लोकांच्या जिभेवर फुलांची परडी असते.

काही माणसे जाळणारी, पोळणारी अग्निशिखा असतात. तर काही माणसे संजिवनी देणारे अमृत वल्ली असतात. पदार्थाचा तिखटपणा डोळ्यांत क्षणिक, पाणी आणणारा; तर शब्दाचा तिखटपणा डोळ्यांत कायम पाणी वहाणारा असतो.

रक्ताळलेल्या जखमेवर औषध घेऊन मलम लावून ती सहज भरून येते. पण शब्दांची जखम हृदयावर झालेली असते. त्याच्यावर कुठलेही सोपस्कार करता येत नाहीत. जखमेवरचा पापुद्रा दूर केला की त्यातून फक्त वेदनाच होतात. फक्त वेदनाच. तेव्हा लोक हो कळली ना तुम्हाला या शब्दांच्या जगातली किमया तेव्हा शब्दांचा वापर जरा जपूनच. आपण आपल्या जवळ फुलांची परडीच बाळगुया म्हणजे आयुष्याच्या पुढील वाटेवर फुलेच फुले असतील, नाही का ?

**सौ. अनिता अ. फणसळकर**
**वाकड, पुणे**


सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

**काटदरे**

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

**चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती**

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

**काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,**

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

(पान.. नं. ५ वरुन)

संशयकल्लोळमधील फाल्गुनराव–कृत्तिकेचे जोडपे. संपूर्ण नाटकच मुळी खोट्या संशयावर आधारित. तसे फाल्गुनराव–कृत्तिकेचे संवाद, बोलणे खटकेबाज, म्हणींनी सजविलेले अगदी तुम्हा कन्या मंडळींना शोभेसे. तसे नवराबायको दोघेही एकाच राशीचे म्हणजे ३६ गुण जमलेले जोडपे. तुम्हा दोघांनाही वाचनाची आवड, दोघांचेही वाचन चतुरस्त्र, दोघांच्याही जीभेवर सरस्वती, दोघांचीही स्मरणशक्ती उत्तम, दोघेही तुंदिलतनु लंबोदर, आणि सतत ''इधर जाऊँ या उधर जाऊँ'' अशा संभ्रमात दोघेही, दोघांच्याही नजरेत काळा रंग, चूक प्रथम भरते. त्यामुळे परस्परांचे कच्चे दुवे शोधत राहाल तर फक्त भांडणेच होणार, तू तू मै मै होणार आणि तुम्ही मग ज्योतिषशास्त्राच्या नावाने खडे फोडणार की कसले ३६ गुण नी काय. पण उलट काय नाही ते बघण्यापेक्षा काय आहे ते बघितले. स्मरणशक्ती, बुध्दी यांचा वापर सकारात्मक कामासाठी केला तर अधिक चांगले, होय ना? तशी दोघांनाही ढगळ कपड्यांची आवड, स्वभाव सौम्य आणि रंगही सौम्यच आवडतात. थोडासा अव्यवस्थितपणा दोघांमध्येही. घरामध्ये पुस्तके, ध्वनीमुद्रिका, सीडीज पासून रिकाम्या बाटल्यापर्यंत कशाचाही संग्रह असणारच. फक्त तो व्यवस्थित ठेवणे दोघांनाही जमत नाही, दोघांच्याही मनात आरोग्यापासून प्रत्येक विषयावर शंकाकुशंका. तेव्हा उत्तर एकच, 'कन्या रास संकटाची' हे डोक्यातून काढून टाका. जीवनात पोटाचे महत्त्व जाणा, पोट बिघडले तर जीवन बिघडते, तुम्ही दोघेही उदरस्थानी येणाऱ्या कन्येचे प्रतिनिधी, एकमेकांना जपा, खुश ठेवा, बिघडवून देवू नका, घरात आनंदी आनंद पसरेल, दोघेही म्हणाल, 'देखो रूठा ना करो, बात नजरों की सुनो, हम ना बोलेंगे अभी तुम सताया न करो.'

तूळ राशीची स्त्री आणि कन्या राशीचा पुरूष हे जोडपे म्हणजे राशीचक्रातील बरोबर मधोमध असणाऱ्या कन्या व तूळ या सहाव्या–सातव्या राशीबरोबर मधोमध येतात. २७ नक्षत्रातील बरोबर मधोमध येणारे चित्रा नक्षत्र या कन्या व तूळ राशीत बरोबर अर्धे विभागलेले असते. १२ राशी आणि २७ नक्षत्रे या गणितामुळे १ रास म्हणजे २–१/४ नक्षत्रे होतात. म्हणून प्रत्येक नक्षत्राचे ४ भाग केले जातात त्याला नक्षत्राचे चरण किंवा पाद म्हणतात. चित्रा नक्षत्राचे पहिले दोन चरण कन्या राशीत तर उरलेले दोन चरण तुळेत येतात. या चित्रा नक्षत्राच्या योगताऱ्यावरूनच आपल्या निरयन विचारसरणीतील मेषारंभ बिंदू ठरविलेला आहे. असो, कन्या राशीला ज्योतिषाची आवड असण्याची शक्यता म्हणून थोडीशी माहिती दिली. मुळामध्ये कन्या ही बुधाची तर तूळ ही शुक्राची रास. हे दोन्ही अंतर्ग्रह रजोगुणी स्वभावाचे. कन्या ही तुमची रास पृथ्वीतत्त्वाची, द्विस्वभाव तर तूळ रास वायूतत्त्वाची, चरस्वभावाची. त्यामुळे तुमची तूळ पत्नी तुमच्यापेक्षा खूप शिडशिडत असण्याची शक्यता.समतोलाकडे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुमच्या पत्नीची निर्णयक्षमता चांगलीच असते. जनसंपर्क, माणसे जोडणे या प्रांतातही ती तुमच्यापेक्षा काकणभर, नव्हे खूपच सरस असते. शुक्राच्या राशीस्वामीत्वामुळे दिसण्यातही तुमच्यापेक्षा उजवी असते. तसे तुम्ही दोघेही सौम्य स्वभावाचे, तुम्हाला साहित्यात रस तर पत्नीला साहित्याबरोबरच संगीत, नृत्य, चित्रकला अशा कितीतरी गोष्टीत रस. तुम्ही टीकाकाराच्या दृष्टीतून बघणार तर ती रसिक नजरेने प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेणार. गृहसजावट, मांडणी यात कलात्मक नजर तिची चांगली, मात्र मागे मागे रहाणे हा स्वभाव असल्याने जगाला तिची किंमत कळत नाही. विश्लेषणात्मक बुध्दी मात्र तुमच्याजवळ चांगली तुमची बुध्दी आणि तिची रसिकदृष्टी यांचा संगम खरोखरच तुमच्या घराला कोणालाही हेवा वाटावा असे आनंदधाम बनवेल आणि घरातून गाण्याचे सूर उमटतील, ''आँखो में क्या जी वह पहला बादल, बादल में क्या जी किसीका आँचल, आँचल में क्या जी अजबसी हलचल''.

---

(पान नं. ११ वरुन)

अनेकानेक प्रदेशांतून अनेक कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वांनी आपल्या स्वयंभू गुणांमुळे, प्रचारकी प्रसिद्धि न मिळविता, अप्रकाशित राहूनच मोठी मोठी कार्ये केली. भोपाळचे माधवराव सप्रे म्युझियम, हैद्राबादची हर्डीकर बाग,

ग्वाल्हेरचे गर्दे स्मारक, लोकसभेचे मावळंकर सभागृह, बंगलोरचा हर्डीकर स्केअर यासारखी अनेकानेक स्मारके त्याची साक्षीदार आहेत. ही लेखमाला अशीच चालू राहिली; तर आपणाला याविषयी भरपूर माहिती देत रहाण्याचा मानस आहे.... आपणापैकी कोणीही ही माहिती वाचून गर्व–वाही होणार नाही.'... पण आपण अगदीच सामान्य आहोत; आपलें कोठेही नांव नाही अशी भावना आपल्यापैकी काहींची झालेली असेल तर ती पूर्ण धुवून टाका, आणि या लोकांचे कार्य समोर आणा एवढेच केलेत तर मरगळ दूर होईल.– आणि म्हणावेसे वाटेल– ''उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत!''

संपर्क : **अवधूत हर्डीकर**
१६, ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंस नगर, पौड रोड, पुणे – ४११ ०३८
फोन : ०२०–२५३८०२०१
नेहमीच वाचा :
www.thekarhaadaa.org

With Best Compliments from
**श्री. सीताकांत गणपतराव जोशी**
**खानापूर, बेळगांव, फो.–०८३३६–२२३७५४**


बायको गेली माहेरी,
काम करी पितांबरी !
घरातील
स्वच्छतेची उत्पादने !
IMPROVED
Extra Thick
Pitambari
Sanit All
Super Power Sanitary Cleaner
5 in 1
Super Active Formula
पितांबरी
Always Shines Bright
Super Improved
Pitambari
Pitambari
Klenz
POWERWASH
THICKER
Pitambari
Dishwash Liquid
For Oily and Stubborn Stains
Rooperi
PITAMBARI
Dishwash Bar
Kam Gale Chale Zyada
PITAMBARI
Dishwash Jar
AOS
पितांबरी®
होमकेअर डिव्हीजन
पितांबरी जार : कमी विरघळे जास्त चाले!
पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा.लि., ठाणे -२ (०२२) ६७०३ ५५५५, टोल फ्री क्रमांक -१८००२२४४१८.
www.pitambari.com., ASM : राजेश जाधव (मध्य मुंबई)- ९१६७४९२७०६, संतोष देसाई : ९१६७४९२७२०

**(पान नं. १३ वरुन )**

भरलेला, अनंत रूपांनी प्रकट झालेला. ज्ञानेश अद्वैतवादी असले, तरी ते विश्वाला माया, विवर्त, स्वप्न, भास मानायला तयार नाहींत. त्यांचें तत्त्वज्ञान अद्वैताच्या आकाशांत डौलानें विहार त्याची झळ कोणास लागत नाही. चंद्राप्रमाणें शीतल व आल्हाददायक असा संतांचा सहवास. त्यांचे निलकंठ चारित्र्य सर्वसामान्य माणसांचे चारित्र्य घडविण्यास प्रेरक ठरते. सांत्वन, मार्गदर्शन आणि आनंद यांचा सहजा सहजी लाभ करून देणारे असे सोयरे म्हणजे सुऱ्हद् लाभण्यांतच समाजाचा तरणोपाय आहे. तसें झाल्यानेंच सुखाचे नंदनवन भूतलावर अवतरण्याचं स्वप्न साकार होऊं शकेल असं तळमळीनं सांगून मृतज्ञता भावनेनं व श्रद्धायुक्त शुद्ध भक्तिभावानें परमात्म्याची उपासना करावी असें ज्ञानेश आवाहन करतात.

आज मोठ्या विलक्षण भोवऱ्यांत आम्ही सांपडलो आहोत. जीवन रूग्णाईत झालें आहे. गरीबाला विपन्नतेची, तर संपन्नाला अतृप्त वासनेची असह्य झळ लागली आहे. आदर्श मानवतेच्या दिशेने आगेकूच वासनेची करण्याऐवजी अधिक अंधाराकडे वाटचाल करीत आहोत. सेवा, त्याग, प्रामाणिकपणा, सहानुभूति, प्रेम या सुखीजीवनासाठी मूलभूत असलेल्या गोष्टी कालबाह्य ठरत आहेत. त्या उलट अनास्था, अविश्वास, अंधश्रद्धा निष्ठेचा अभाव, संघर्ष इत्यादींच्या वणव्यांत सापडल्या कारणांने भौतिक सुखसाधने उपल्ध असून ही समाधानाऐवजी वैफल्याची जोणीव तीव्रतेने होत आहे. स्वार्थ, संकुचित दृष्टि, भ्रष्टाचार, सत्तालोपलुपता, चारित्र्यहीनता यांची कीड लागून जीवन नासू पहात आहे.

असें असूनही मानव आणि मानवाची संस्कृति टिकून आहे. यांचे कारण ज्ञानेशांच्या पसायदानांत प्रकट झालेली उदात्तता थोड्या फार प्रमाणांत कां होईना कुठें ना कुठें अद्यापि जीव धरून आहे, प्रभावीपणें कार्य करीत आहे हेंच. त्या उदात्ततेला जपणें, तिची जोपासना करून तिला वृद्धिंगत करणें, जिवांतील शिवजाग करणें, हीच मानवतेच्या सुरक्षिततेची हमी ठरेल असें म्हटल्यास त्यांत वावगे काय आहे?

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!




कोंकण काजू

उत्पादक :

कोकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर

मु. पो. - आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१

## नातीगोती

माझी कन्या, माझी स्नुषा
माझी भगिनी, माझी वहिनी
माझा-माझी ह्याच शब्दात
जपली गेली नाती गोती ।।१।।
निमित्त आहे औक्षणाचे
शब्द आहेत मायेचे
निरांजनाच्या दोन वाती
जपतील ती नातीगोती ।।२।।
मनात आहे माया-ममता
ह्याच सदीच्छा, ह्याच शुभेच्छा
जपतील आपली नाती गोती ।।३।।
तीळा-तीळातुनी वाढो ममता
संक्रांतीच्या ह्याच शुभेच्छा
मनिषा असे हीच एवढी
जपली जावी नाती गोती ।।४।।

**श्रीमती आराधना बाक्रे, सोलापूर**

With Best Compliments from

**श्री. गणेश गुर्जर, फोन नं. - ९८९०९९०११३**

**श्री. हेमकिरण बाक्रे, फोन नं. - ९८५०७५४२१०**

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे.**

*With*

*Best Compliments*

*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,

Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com

Shrikant Sakhalkar 9850130920



# संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे** यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वासंतिक मेळावा दि. १९ मे २०१२ रोजी श्रुती मंगल कार्यालय, डेक्कन जिमखाना, पुणें येथे आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी, संघाने कऱ्हाडे ज्ञातीतील खालील १३ महिला उद्योजिकांचा सत्कार पदाधिकाऱ्यांच्या हस्ते केला.

१) सौ. धनश्री आठल्ये
२) श्रीमती सरोज भडभडे
३) डॉ. मंजुश्री भाटे
४) सौ. शीला देऊस्कर
५) डॉ साधना देव
६) सौ. निलीमा दिक्षीत
७) सौ. प्रज्ञा हर्षे
८) श्रीमती रमा पंडीत
९) सौ. मृणालिनी फणसळकर
१०)सुप्रिया तळवलकर
११)आसावरी अत्रे
१२)पल्लवी नाईक
१३)सौ. मानिनी गुर्जर

संघने अशा प्रकारचा सत्कार प्रथमच आयोजित केला होता. त्यानंतर सौ. मानिनी गुर्जर यांच्या मराठी गाण्यांचा सुरेल व सुरेख कार्यक्रम झाला. सभासदांनी दोन्ही कार्यक्रमांचा आनंद मनमुराद लुटला. श्री. श्रीगजानन गुर्जर यांच्या आभारप्रदर्शनानंतर श्रुतीच्या सुग्रास भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. विशेष म्हणजे आयपीएलची पुण्यात मॅच उन्हाळी सुट्ट्या व शहरांत इतर सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असूनही या वासंतिक मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

सदर कार्यक्रमासाठी विश्वस्त मंडळाच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले ज्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे**
**वासंतिक सम्मेलन**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाण्याचे वासंतिक सम्मेलन दि. २२.४.२०१२ रोजी साजरे करण्यात आले. यानिमित्त श्री. अजितराव आपटे, पुणे यांना 'छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ' यावर त्यांचे विचार मांडण्यासाठी आमंत्रित केले होते. 'जाणता राजा' या नाटकात औरंगजेबाचे काम श्री अजितराव करतात. यांची ओळख श्री. सुधीर जावडेकर यांनी करून दिली.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत स्वराज्याची स्थापना करणारे गनिमी काव्याचा उपयोग करणारे, यापेक्षा वेगळ्या व खूप परिचित नसलेल्या त्यांच्या एका वेगळ्या पैलूवर श्री आपट्यांनी प्रकाश टाकला. महाराज प्रजावत्सल तर होतेच, पण जनतेच्या सुखसोईकडे लक्ष व राज्य सुस्थिर ठेवणारे उत्तम प्रशासक होते.

महाराजांनी ३५ वर्षे उत्तम राज्य केले. त्यातली केवळ ६-६ १/२ वर्षे रणांगणातल्या मोहिमेत गेली. राज्यप्रशासन उत्तम होण्यासाठी त्यांनी अष्टप्रधान मंडळ नेमले होते त्याची विस्तृत माहिती श्री अजितराव यांनी रंजकतेने सादर केली. अष्टप्रधान मंडळाच्या व्यक्तींवर अतिशय महत्त्वाच्या जबाबदाऱ्या होत्या. त्यानुसार त्यांचे पगारही भरपूर होते.

अष्टप्रधान मंडळ पुढीलप्रमाणे होते.

१) पेशवा- संपूर्ण शासनाची देखभाल करणारे व सेनापती पेक्षा जास्त महत्त्व होते.
२) अमात्य:- राज्याचे उत्पादन व खर्च याचा हिशोब ठेवायचे.
३) मंत्री अथवा वाकनीस- महाराजांची व्यक्तीगत सुरक्षा तसेच गुप्तहेर व माहिती खाते यांचेकडे असे.
४) चिटणीस- राजकीय पत्र व भाषाशैलीचे काम हे करत
५) सुमंत- राजांचा परराष्ट्र मंत्री. करार करणे, युद्धाबाबत चर्चा, रत्ने देणे. ही यांची महत्त्वाची कामे.
६) सेनापती- सेनेची भरती, रसद, युद्धक्षेत्रातील सैन्याची जमवाजमव यांचे काम असे
७) पंडीतराव- दानधर्म विभाग
८) न्यायीविभागाचा प्रमुख-सैनिक व रयतेच्या तक्रारींचे अंतिम निकाल छत्रपती देत.

शिवयरायांच्या सव्यवस्थापनातील गोष्टी आजही अनुकरणीय आहेत- गेल Job rotation, Motivation आजच्या व्यवस्थापन क्षेत्रांत महत्त्वाच्या वाटणाऱ्या या गोष्टी महाराजांनी त्या काळात राबवल्या होत्या असेही आपटे यांनी सांगितले. मन भारावून टाकणारा हा वृत्तांत ऐकल्यावर आभारप्रदर्शन कार्यवाह सौ. करकरे यांनी केले.


With Best Compliments From

Happy Home Services
Consultant for Real Estate

S.S. Naphade
Ph. 25882893
Mobile : 9422302641

Deals in outright Purchase / Rental of Bungalows, Flats, Shops, Plots & Property

Bldg. No. B-3, Flat No. B-6,
Chintamaninagar, Anand Park,
Aundh, Pune - 411 007.

# श्रध्दांजली

**आठल्ये गुरुजी**

पौराहित्य आणि भिक्षुकी यापुरताच वेदांचा अभ्यास मर्यादित नाही; ती एक जीवन पध्दती आहे व वारशाने चालत आलेल्या त्या पध्दतीचा अधिकाधिक लोकांपर्यंत प्रसार करण्याची गरज आहे. हा विचार असणाऱ्या व्यक्ती आज तशा दुर्मिळच असा विचार मांडणारे रत्नागिरीतील वेदमूर्ती घनपाठी विनायक सीताराम आठल्ये गुरुजी यांनी ९८व्या वर्षी प्रदीर्घ आजारानंतर देह ठेवला. रत्नागिरी जिल्ह्याच्या संगमेश्वर तालुक्यातील भडकंबा गावी एक फेब्रुवारी १९१४ रोजी आठल्ये गुरुजींचा जन्म झाला. ऋग्वेदाच्या शाकल शाखेतून दशग्रंथांसह घनांत पदवीपर्यंत त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी २५ वर्षे सांगलीतील श्री गणपती संस्थान वेदपाठशाळेत, तर १६ वर्षे रत्नागिरीतील वेदपाठशाळेत अध्यापन करून अनेक विद्यार्थी घडवले. राज्यपाल व शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते त्यांना १९७० मध्ये पुरस्काराने गौरवण्यात आले. १९७१ मध्ये शृंगेरीच्या पीठाचे जगद्‌गुरु शंकराचार्य यांच्या हस्ते त्यांना वैदिक मार्तंड आणि वैदिक शिरोमणी ही उपाधी देण्यात आली. तर वाराणसी येथे महाराज काशिनरेश यांच्या हस्ते सुवर्ण–कंकणाची विशेष भेट त्यांना देण्यात आली. आठल्ये गुरुजींच्या निधनामुळे वेदाभ्यासातील एक पर्व संपले आहे.

**वसंत तांबे**

वसंत तांबेंनी गेल्या २ तारखेलाच वयाची पंचाहत्तरी साजरी केली होती. त्यानंतर काही दिवसांतच आलेली त्यांच्या निधनाची बातमी राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील त्यांच्या समवयस्क तसेच नव्या पिढीच्या सहकाऱ्यांना चुटपुट लावून गेली असणार. तांबे यांचे लहानपण पुण्यात गेले तेव्हापासून ते संघाचे सक्रिय कार्यकर्ते बनले. मुंबई महानगर कार्यवाह म्हणून त्यांनी इथे कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली. वनवासी कल्याण आश्रामाच्या कामाला आकार देण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्या काळात मुंबईच्या नायगावातील त्यांचे घर कार्यकर्त्यांसाठी केंद्रच बनले होते. आदिवासी मुलांना मुंबईत आणणे, त्यांना शिकवणे, मुंबई फिरवणे वगैरे कामे ते करत. महाराष्ट्रभरातील कार्यकर्त्यांना त्यांचा मोठा आधार होता. १९९५ च्या सुमारास उभ्या राहिलेल्या विश्व संवाद केंद्राच्या कामात, तसेच रामभाऊ म्हाळगी प्राबोधिनीच्या उभारणीतही त्यांनी आपल्या विचारांचे योगदान दिले होते. जनकल्याण समितीच्या वतीने भूकंपग्रस्तांसाठी बांधलेल्या घरांची डिझाइन्स त्यांनी तयार केली. त्यांचे अलीकडचे महत्त्वाचे काम म्हणजे, त्यांच्या संकल्पनेतून साकारलेली 'फोरम फॅार इंटिग्रेटेड नॅशनल सिक्युरिटी'ही संस्था. तिचे काम आज राष्ट्रीय स्तरावर सुरू असून, अनेक निवृत्त लष्करी अधिकारी त्यात कार्यरत आहेत. वसंतरावांचे वैयक्तिक आयुष्य साहित्य, संगीत यांनी समृद्ध होते. ते उत्तम तबलावादक होते. शास्त्रीय संगीताचे दर्दी होते.

'विचार करण्यासारखे काही', ज्येष्ठपर्व','प्रश्न प्रश्न प्रश्न', 'दक्षिण दिग्दर्शन' ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचे लेखनकार्यही अखेर–पर्यंत सुरू होते. वसंत तांबे यांच्या निधनाने रा.स्व. संघाचा एक जुनाजाणता आधारस्तंभ काळाच्या पडद्याआड गेला आहे.

**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ वरील दोन्ही आदरणीय व्यक्तीमत्त्वांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.**


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**
इंटरिअर डेकोरेटर्स
**श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८**

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

# आद्य मराठी पत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आद्यपत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ ला 'दर्पण' या वर्तमानपत्राचा पहिला अंक प्रसिद्ध केला. त्यास १८० वर्षे झाली. बाळशास्त्रींचा जन्म देवगड तालुक्यातील पोंभर्ले या खेडेगावात झाला. वडील व्युत्पन्न ब्राह्मण. बाळशास्त्रींचे प्राथमिक शिक्षण, वेदाध्ययन, संस्कृत ग्रंथाचा अभ्यास गावीच झाला. पुढे मुंबईत आल्यावर त्यांच्या कर्तृत्वाला मोठा वाव मिळाला. महाराष्ट्रातील पहिले आद्य पत्रकार म्हणून आजची पिढीही त्यांचा गौरवाने उल्लेख करीत असली तरी ते इतर अनेक विषयांत प्रकांड पंडित होते. भारतातील पहिले गणिताचे प्राध्यापक, इतिहासकार, भूगोलतज्ञ, एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या ७ संस्थापकापैकी एक– समाजसुधारक, स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते अशा विविधांगी पैलूंचे दर्शन त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या ग्रंथामधून दिसते. त्यांच्या जांभेकर कुटुंबातील गणेश गंगाधर जांभेकर यांनी 'पश्चिम भारतातील नवयूग प्रवर्तक आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर' या नावाने चार ग्रंथ लिहिले आहेत. ते ४ जानेवारी १९२८ मध्ये प्रसिद्ध झाले होते. या ग्रंथाच्या प्रास्ताविकात इंग्रजी, मराठी आणि संस्कृतमध्ये श्लोक स्वरुपात ८ चरणांमध्ये बाळशास्त्रींची जी महती कथन केली आहे ती त्या काळच्या मराठी भाषेच्या शैलीत येथे दिली आहे.

आङ्ग्लसत्ताधिष्ठि महाराष्ट्र देशात बाळ गंगाधरशास्त्री नामक राष्ट्रोन्नतिसाधक थोर नरवीर निर्माण झाला ।।१।।

ह्या जांभेकर कुलश्रेष्ठाला 'बालबृहस्पती', 'आद्याचार्य' असे संबोधिले आहे ।।२।।

हा अतुल गणिती व निष्णात ज्योतिषी होता. प्राच्य व पाश्चात्य शास्त्रे यांस अवगत होती आणि याला बारा भाषा येत होत्या ।।३।।

हा शिकविण्यात अत्यंत कुशल, दानशील, समदर्शी व सज्जन होता. भाऊ दाजी लाड, दादाभाई नौरोजी, केरु नाना छत्रे, दादासाहेब तर्खडकर हे याचे प्रसिद्ध शिष्योत्तम होत ।।४।।

ह्याने व्याकरण, भूगोल, इतिहास, शून्यलब्धिगणित इत्यादी विषयांवर ग्रंथरचना केली आणि मराठी गद्याला योग्य वळण लावणारा ग्रंथकार म्हणून हा सर्वमान्य होता ।।५।।

हा 'दर्पण'चा व 'दिग्दर्शन'चा निर्माता असून आपल्या उपदेशाने महाराष्ट्राला जागे करणारा हाच पहिला मान्यवर संपादक होय ।।६।।

प्राचीन लिपिलेख लावणारा व नाना राष्ट्रेतिहास जाणणारा आद्य भारतीय पुराणेतिहास संशोधक म्हणून याची गणना आहे ।।७।।

हा संस्कृत भाषेत निपुण असून स्वभाषा व स्वधर्म यांचा पुरस्कर्ता होता. पाठभेदयुक्त ज्ञानेश्वरी यानेच प्रथम प्रकाशित केली, अशी याची ख्याती आहे ।।८।।

वरील परिच्छेदातून बाळशास्त्रींचे व्यक्तिमत्व केवढे विशाल होते याची कल्पना येते. एवढ्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचा बालबृहस्पती मराठी भाषेला लाभला हे मराठीचे भाग्यच होय.



बाळशास्त्रींना इंग्रजी, मराठी, संस्कृत याबरोबरच गुजराती, पार्शी, बंगाली या भाषाही अवगत होत्या. दर्पण वृत्तपत्र काढण्यामागची त्यांची प्रेरणा ही स्वदेशाभिमान हीच होती. त्याचबरोबर समाज प्रबोधनाचे कामही त्यांनी दर्पणद्वारे केले. हे वृत्तपत्र त्यांनी मोठ्या स्वार्थत्यागाने चालविले. परंतु आर्थिक अडचणींमुळे ते १८४० साली बंद करावे लागले. नंतर त्यांनी 'दिग्दर्शन' नावाचे मासिक सुरु केले. लोकशिक्षणाच्या दृष्टीने या मासिकाचा त्याकाळी फार उपयोग झाला.

अशा या प्रकांडपंडित बालबृहस्पतीचा मृत्यू आकस्मिक आजाराने १८ मे १८४६ला वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी झाला. एवढ्या लहान वयात त्यांनी केलेले लेखनाचे आणि प्रबोधनाचे काम प्रचंड आहे. या थोर आद्यपत्रकाराला कोटी कोटी प्रणाम!

पोंभर्ले या बाळशास्त्री जांभेकरांच्या जन्मगावी त्यांच्या वंशजांकडून उपलब्ध झालेल्या जागेवर एक सभागृह असून त्यामध्ये बाळशास्त्रींचा अर्धपुतळा अशा स्वरुपाच स्मारक 'महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी' या फलटण येथील संस्थेच्या अथक प्रयत्नांमुळे उभे राहिले आहे. या संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ यांनी या कामासाठी आपल्या पत्रकार सहकाऱ्यांच्या मदतीने निधी उभा करुन हे स्मारक उभारले आहे. दरवर्षी ६ जानेवारीला या ठिकाणी पत्रकार दिन साजरा केला जातो.

या गावी जाण्यासाठी चांगला रस्ताही नव्हता. तेथील ओढ्यावर पुल बांधुन आता तरळा–विजयदुर्ग मार्गावर एक बाजूला असलेल्या या पोंभुर्ले गावातील बाळशास्त्री स्मारकापर्यंत जाता येते.

पत्रकार कल्याण निधीला या कामी महाराष्ट्रातील अनेक पत्रकारांचे तसेच शासनाचेही सहकार्य लाभले. ग्रामस्थांचे आणि जांभेकर कुटुंबीयांचेही चांगले सहकार्य या कामी मिळाले.

बाळशास्त्रींच्या द्विशताब्दीनिमित्त तरळे–विजयदुर्ग मार्गाला बाळशास्त्रींचे नाव देण्याची मागणी :–

बाळशास्त्री जांभेकर यांची २०० वी जयंती १६ फेब्रुवारी २०१२ रोजी येत आहे. त्यानिमित्ताने तरळे–विजयदुर्ग या राज्यमार्गाला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे अशा मागणीचे निवेदन पुणे येथील 'जांभेकर प्रतिष्ठान' या संस्थेतर्फे शासनाला देण्यात आले आहे.

# सुभाषित

**श्री. माधव सप्रे**

**संस्कृत भाषेत एकाच शब्दाचे अनेक अर्थ असूं शकतात. जसे ''हरी'' या शब्दाचे किमान पंचवीस तरी अर्थ कोषात आढळतील. ''हरी'' म्हणजे विष्णू, कृष्ण, इंद्र, सूर्य, सिंह, घोडा, वानर, पोपट, मोर बेडूक, हंस इत्यादी. एकाच शब्दाच्या अनेक अर्थामुळे. अनेकदा विनोद निर्मिती होते. बोलणारा शब्द एका अर्थाने वापरतो, तर ऐकणारा त्याचा दुसराच अर्थ घेतो. याचेच एक गमतीदार उदाहरण खाली दिलेले आहे.**

**कस्त्वं? 'शूली' मृगय 'भिषनं' नीलकंठः प्रियेऽ हं।**
**''केकामकांकुरु'' पशुपती नैव दृश्ये विषाणे।।**
**स्थाणुर्मुग्धे न वदति तरु जीविते शः शिवायाः।**
**गच्छाटयव्या मिती हतवचः पातु व श्वन्द्र चूडः।।**

**वरील श्लोक हा शिव आणि पार्वती यांचे मध्ये झालेला संवाद**

संस्कृत वाङ्मयात सुभाषिते हे एक स्वतंत्र सुंदर दालन आहे. आपल्या ''संपर्क'' या कऱ्हाडे ब्राह्मण संघाने चालविलेल्या त्रैमासिकातून अशीच काही सुभाषिते आपण पहाणार आहोत.

–१–

मा यात पान्था: पार्थ भीम रश्या:।
दिगम्बर: कौऽपि तमालनील:।।
विनस्त हस्तोऽपि नितम्बबिम्बे।
धूर्त: समाकर्षति चित्त वित्तम्।।

अर्थ : हे पान्थ! तू भीमेकडे जाऊं नकोस.भीमेच्या काठी तो नग्न शामकांत उभा आहे. आपल्या कटीवर हात ठेऊन तो धूर्त येणाऱ्याचे चित्त आणि वित्त दोन्ही चोरून घेत असतो.

मराठी अनुवाद – भीमकडे जाऊ नकोस पांध
तो नग्न तेथे कुणी शामकांत
कटीवरी ठेऊन हस्त धूर्त
चोरी झणी रे तच चित्त, पित्त।।

(अनुवाद–ल.गो. विंझे)

–२–

श्री विष्णूला नरसिंह अवतार कां घ्यावा लागला या विषयी खालील गमतीदार सुभाषित पहा–

अवतार त्रदं दृष्टवा मानवै: कवली कृतम्।
ततस्तु भगवान् साक्षात् नरसिंहं वपुर्दधौ।।

अर्थ – भगवान विष्णूचे आधींचे पहिले तीन अवतार (मत्स्य, कूर्म, वराह) मानवाने (कवलीकृतम्) घास म्हणून, भक्ष्य बनविले. म्हणून भगवान क्रुद्ध झाले आणि त्यानी नृसिंह अवतार घेऊन मानवाला मारण्या करिता ते उद्युक्त झाले. (हिरण्यकशपू हा प्रल्हादाचा पिता राक्षस असला तरी मानवच होता हा भावार्थ)

–३–

संस्कृत भाषेत एकाच शब्दाचे अनेक अर्थ असूं शकतात. जसे ''हरी'' या शब्दाचे किमान पंचवीस तरी अर्थ कोषात आढळतील. ''हरी'' म्हणजे विष्णू, कृष्ण, इंद्र, सूर्य, सिंह, घोडा, वानर, पोपट, मोर बेडूक, हंस इत्यादी. एकाच शब्दाच्या अनेक अर्थामुळे. अनेकदा विनोद निर्मिती होते. बोलणारा शब्द एका अर्थाने वापरतो, तर ऐकणारा त्याचा दुसराच अर्थ घेतो. याचेच एक गमतीदार उदाहरण खाली दिलेले आहे.

कस्त्वं? 'शूली' मृगय 'भिषनं' नीलकंठ: प्रियेऽ हं।
''केकामकांकुरु'' पशुपती नैव दृश्ये विषाणे।।
स्थाणुर्मुग्धे न वदति तरु जीविते श: शिवाया:।
गच्छाटयव्या मिती हतवच: पातु व श्वन्द्र चूड:।।

वरील श्लोक हा शिव आणि पार्वती यांचे मध्ये झालेला संवाद (संभाषण आहे. शंकर घरी आलेला आहे. दार बंद आहे. पार्वतीला शंकराची थट्टा करण्याची लहर येते. ती आतून विचारते ''कस्त्वं'' म्हणजे तू कोण? शंकर उत्तर देतात ''शूली'' म्हणजे मी शंकर. पण पार्वती शूलीचा अर्थ पोटांत दुखणारा असा घेते आणि सांगिते, तू शूली म्हणजे म्हणजे तुझ्या पोटांत दुखते आहे तर इथे काय करतोस? ''मृगय भिणजं.'' म्हणजे तू वैद्यराजाला शोध, आणि त्याचेकडे जा. त्यावर शंकर पुन्हा सांगतात, अग प्रिये, मी नील कंठचा अर्थ 'मोर' असाही आहे. पार्वती तोच अर्थ घेते आणि म्हणते, तू नीलकंठ, मग तर एक केका ओरडून दाखव. (मोराच्या ओरडण्याला केका म्हणतात). त्यावर शंकर पुन्हा सांगतात, अगं, मी ''पशुपती'' म्हणजे शंकर, परंतु पार्वती पशुपतीचा अर्थ बोकड असा घेते आणि विचारते, तूं पशुपती (बोकड) तर तुझी शिंगे दिसत नाहींत. त्यावर पुन्हा शंकर सांगतात, कीं मी ''स्थाणु'' 'स्थाणु' म्हणजे शंकर तसेच ''स्थाणु'' म्हणजे 'वृक्ष' तर आसाही अर्थ आहे. पार्वती तोच अर्थ घेऊन शंकराला म्हणते, पण वृक्ष तर बोलत नाहीत. (न वर्दात तरू:) त्यावर शंकर पुन्हा सांगतात, अगं, मी ''जीवितेश: शिवाया:'' शिवा म्हणजे पार्वती तसेच ''शिवा'' म्हणजे कोल्हीण असाही अर्थ आहे. शंकर सांगतो मी शिवेचा, पार्वतीचा, जीवितेश म्हणजे पती वा प्रियकर पण पार्वती दुसरा अर्थ घेते आणि म्हणते, तू, कोल्हीण आहेस तर इथे काय करतेयस ''गच्छाटव्या'' म्हणजे रानात जा. यावर शंकर हताश होतात. असे हताश झालेले शंकर आमचे रक्षण करोत. (हतवच: पातु श्वन्द्र चूड:)